# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी
क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र. ३९/२०२५ दिनांक २६/०१/२०२५

**प्रेस नोट**

## ३५ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२५

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात मा. पोलीस आयुक्त, मि.भा. व.वि, मा.पोलीस उपायुक्त, मुख्यालय, मि.भा.व.वि तसेच मा.सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक, मि. भा. व. वि. यांच्या मार्गदर्शनाखाली **३५ वे रस्ता सुरक्षा अभियान** २०२५ अंतर्गत **दिनांक २५/०१/२०२५ रोजी** काशिमीरा वाहतूक विभागाचे प्रभारी अधिकारी श्री सागर इंगोले यांच्या तर्फे व प्रादेशिक परिवहन विभाग, ठाणेचे परिवहन अधिकारी श्री मानसिंग खाडे आणि त्यांचा स्टाफ असे संयुक्तिकपणे रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत रस्ता सुरक्षे बाबत जनजागृती होण्याकरिता मिरा-भाईंदर शहरातील मोटार वाहन ट्रेनिंग स्कुल ओसिएशन चे वाहन धारक व मालक यांची जनजागृती करण्याच्या उद्देशाने कार व बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. सदर कार व बाईक रॅली मध्ये ज्या मोटार सायकलस्वार यांनी हेल्मेट घातले नाही अथवा वाहतूकीचे नियम पाळत नाहीत अशा वाहन धारकांना हेल्मेट घालण्याबाबत तसेच वाहतूकीचे नियम पाळणे बाबत मार्गदर्शन करण्यात आले व वाहतूक नियमांचे पालन करणा-या वाहन चालकांना गुलाब पुष्प देवून त्यांचे कौतूक करण्यात आले. **"वाहतूकीचे नियम पाळा अन्यथा यमाशी गाठ" याची प्रचिती लोकांमध्ये व्हावी या करिता प्रातिनिधीक स्वरुपात रस्त्यावर यमराज उतरवून लोकांमध्ये वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत आवाहन करण्यात आले.**

सदर रस्ता सुरक्षा अभियाना मध्ये मिरा-भाईंदर शहरातील मोटार वाहनांचे ट्रेनिंग स्कुल मधील **एकूण ७० ट्रेनिंग स्कुल मधील शिक्षक चालक हे कार रॅली मध्ये उपस्थित होते.**

-----------------------------oo----------------------------